**<u>ठळक बातम्या</u>**

- अयोध्या मंदिर अपहार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या केंद्र आणि राज्यसरकारला तसंच श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाला नोटिसा

- बद्रीनाथ मंदिर दान अपहार प्रकरणी मंदिर समितीच्या अध्यक्षांना अटक

- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीची अनुदानप्राप्त ६ वसतिगृह बंद असल्याचं कॅगचं निरीक्षण

**आणि**

- पुणे जिल्ह्यात वारी मार्गावर अपघातात ३ महिलांचा मृत्यू, ७ जण जखमी

**<><><><><>**

अयोध्येच्या रामजन्मभूमी मंदिरात देणग्या आणि दानातल्या वस्तूंचा अपहार झाल्याच्या आरोपांची न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याचे आदेश मागणाऱ्या याचिकासमूहावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकारला तसंच राममंदिराचं व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाला नोटिसा बजावल्या आहेत . सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची, आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठासमोर याचिकांची सुनावणी होत आहे. या प्रकरणी चौकशी करणाऱ्या उत्तर प्रदेश पोलिसांच्या तपासपथकानं चौकशीच्या प्रगतीचा अहवाल सादर करावा असंही न्यायलयाने सांगितलं.

**<><><><><>**

उत्तराखंडच्या बद्रीनाथ मंदिरात दान अपहार प्रकरण उघडकीला आलं असून काल रात्री विशेष चौकशी पथकाने बद्री केदार मंदिर समितीच्या अध्यक्षांना

डेहराडून इथून चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. बद्रीनाथ मंदिरात २ जुलै रोजी दानपेटीतल्या रकमेची मोजणी सुरु असताना त्यातले घोटाळे लक्षात आले आणि समितीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी विशेष पथक स्थापन करून संशयित आरोपींचा शोध सुरु केला होता. संशयिताला अखेर डेहराडूनमधून ताब्यात घेण्यात आलं असून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि इतर नोंदींची तपासणी सुरु केली आहे.

**<><><><><>**

आसाममधल्या २७ जणांना परदेशी घोषित करणारे परदेशी नागरिक न्यायाधिकरणाचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज रद्द केले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठानं हा महत्त्वाचा निर्णय दिला. तांत्रिक त्रुटी आणि किरकोळ विसंगतींच्या आधारावर आपल्याला परदेशी घोषित करण्यात आल्याचा युक्तिवाद करत या २७ नागरिकांनी न्यायालयात दाद मागितली होती. सर्वोच्च न्यायालयानं गुवाहाटी उच्च न्यायालय आणि परदेशी नागरिक न्यायाधिकरणाचे जुने आदेश बाजूला सारून या प्रकरणांची पुन्हा सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत, तसंच तोपर्यंत याचिकाकर्त्यांवर कोणतीही सक्तीची किंवा कठोर कारवाई न करण्याचे आदेश सरकारला दिले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय आरोग्य संशोधन धोरणाच्या मसुदा निर्मितीसाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं सूचना मागवल्या आहेत. देशाच्या आरोग्य संशोधन प्रणालीला योग्य रूप आणि बळकटी देण्यासाठी या धोरणाची निर्मिती केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्य सेवांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विश्वासू, सर्वसमावेशक, स्वावलंबी आणि प्रभावी व्यवस्थेच्या निर्मितीत हे धोरण सहाय्यक ठरेल. विविध हितसंबंधीनी दिलेल्या सूचनांचा आणि शिफारशींचा समावेश करून हे धोरण तयार

केलं जाणार आहे. त्यामुळे इच्छूकांनी २७ जुलैपर्यंत आपल्या सूचना सादर कराव्यात असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इसरोनं गगनयान मोहिमेशी संबंधित क्रु मॉड्युल प्रणालीच्या तीन महत्त्वाच्या चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या. पहिल्या चाचणीत क्रु मॉड्युल अपरायटिंग प्रणालीची कार्यक्षमता तपासण्यात आली. समुद्रात गेल्यानंतर ही प्रणाली पुन्हा सरळ स्थितीत येण्यास यशस्वी ठरली. दुसर्या चाचणीत क्रु मॉड्युल आणि अंतराळवीर यांना परस्परांपासून विभक्त करणारी यंत्रणा यशस्वीपणे कार्यरत असल्याचं सिद्ध झालं, तर तिसर्या चाचणीत क्रु मॉड्युलची संरचनात्मक प्रणाली अपेक्षेनुसार कार्यरत असल्याचं निष्पन्न झालं. या यशस्वी चाचण्यांमुळे भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेच्या तयारीला आणखी बळ मिळाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<><><><><>**

स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांविरोधात दिल्लीत जेएनयू आणि जंतरमंतर परिसरात कॉकरोच जनता पार्टी आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज जाहीर पाठिंबा दिला. कोणत्याही राजकीय झेंड्याविना, राजकीय मतभेद दूर सारून सर्वच राजकीय पक्षांनी तसंच लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यात सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केलं. नीट परीक्षा पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि पीडित विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई मिळावी, ही आंदोलकांची मागणी योग्य असल्याचं ठाकरे म्हणाले. येत्या २० जुलै रोजी आंदोलकांच्या संसद मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेना महाराष्ट्रातही आंदोलन करणार असल्याचं ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या परंतु बंद असलेल्या राज्यातल्या सहा वसतिगृहांना गेली चार वर्ष सरकारी अनुदान मात्र मिळत असल्याचं नियंत्रक आणि महालेखापरीक्षक - कॅग च्या अहवालात म्हटलं आहे. यातली चार वसतिगृहे जालना जिल्ह्यात असून एक लातूर आणि एक बुलढाणा जिल्ह्यात असल्याचं अहवालात म्हटलं आहे. या वसतिगृहांची अवस्था अतिशय वाईट असून गेली चार वर्ष त्यात एकही विद्यार्थी राहत नाही . तरीही राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाकडून या वसतिगृहांना दीड कोटी रुपयांहून अधिक अनुदान दिल गेलं असल्याचं निरिक्षण अहवालात नोंदवलं आहे. इतर वसतिगृहांची परिस्थिती वाईट असून विद्यार्थ्यांना प्राथमिक सोयी सुविधाही मिळत नसल्याचं अहवालात म्हटलं आहे. राज्यातल्या ४९ सरकारी वसतिगृहांमध्ये पर्यवेक्षक नाही, तर मुलींसाठी असलेल्या ५ वसतिगृहांमध्ये पुरुष पर्यवेक्षक नेमले गेल्याच निरीक्षणही कॅगने नोंदवलं आहे. २०20 सालापर्यंत २०० वसतिगृह बांधण्याचं सरकारच उद्दिष्ट पुरेसा निधी मंजूर झाला असूनही पूर्ण झालेलं नाही .

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात सासवड–जेजुरी मार्गावर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीच्या पुढे जात असलेल्या वारकरी दिंडीच्या ट्रकने धडक दिल्यामुळे तीन वारकरी महिलांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात चार वारकरी जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हा ट्रक नांदेड जिल्ह्यातल्या एका दिंडीचा होता. ट्रक चालकाला ताब्यात घेण्यात आल्याचं पोलिस सूत्रांनी सांगितलं. मृत महिला सांगली जिल्ह्यातल्या कसबेडिग्रज गावच्या रहिवाशी होत्या.

उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, जखमी वारकरी भगिनींची रुग्णालयात जाऊन भेट घेतली.

पंढरीच्या वाटेवर निघालेल्या वारकऱ्यांची सुरक्षितता ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे सर्वांनी वाहन चालवताना चालणाऱ्या वारकऱ्याची काळजी घ्यावी, असं आवाहन पवार यांनी केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, मृत वारकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. मृतांच्या कुटुंबियांना त्यांनी राज्य सरकारतर्फे प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहिर केली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. ही घटना दुर्दैवी असून, पंढरीच्या वारीमध्ये संपूर्ण सुरक्षितता आणि सावधानतेच्या उपाययोजना करण्याच्या सक्त सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

५६व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिंपियाडमधे प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. या विद्यार्थ्यांचं यश भारताच्या अनंत युवाशक्तीचं प्रतीक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मुंबईचा श्रेष्ठ सुरैया आणि पुण्याचा कनिष्क जैन या विद्यार्थ्यांसह ५ जणांनी कोलंबियात बुकारामांगा इथं झालेल्या या स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदकं पटकावली.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात बावनथडी धरण प्रकल्पग्रस्त आदिवासींनी २ महिन्यापूर्वी कालव्यात उतरून केलेल्या आंदोलन प्रकरणात पोलिसांनी आता ९ जणांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. धरणातल्या गावांचं पुनर्वसन करण्यात आलं आहे. मात्र, प्रकल्पग्रस्त आदिवासी आणि शेतकऱ्यांनी त्यांना मिळालेल्या तुटपुंज्या मदतीविरोधात हे आंदोलन केलं होतं.

**<><><><><>**

विंबल्डन टेनिस स्पर्धेत इटलीच्या जेन्नीक सिनर याने सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावलं. काल झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात सिनरने जर्मनीच्या अलेक्झांडर त्स्वेरेव वर 6-7, 7-6, 6-3, 6-4 अशी मात केली.

याच स्पर्धेच्या महिला दुहेरीत, चीनी-फ्रेंच जोडीने कॅनेडियन-ब्राजील जोडीचा 6-3, 7-5 असा पराभव करून अजिंक्यपद पटकावलं.

//<><><><><><>//